जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सोमवार दि.३ जून २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१  अंक : २७६

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com  Lokneta News - लोकनेता न्युज  8459977904  www. lokneta.com


## ७-८ जूनला मान्सून तळ कोकणात दाखल होणार

# पुढील २ दिवस राज्यात पावसाची शक्यता, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, कोकणात इशारा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**पुणे (वृत्तसंस्था)**

नुकतेच मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे. त्यानंतर राज्य मान्सूनची प्रतीक्षा आहे. आता येत्या ७ ते ८ जूनला मान्सून तळकोकणात दाखल होणार असल्याचा अंदाज आहे. तसेच पुढील दोन दिवस राज्यात आता मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मराठवाडा, कोकण, मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी वाढ झाली होती. अनेक जिल्ह्यांत उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. मात्र आता राज्यात पावसाचा अंदाज असल्याने काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. त्यातच येत्या २ ते ३ दिवसात मान्सून कर्नाटकात पोहोचण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर ७ ते ८ जुनपर्यंत मान्सून राज्याच्या प्रवेशद्वार असलेल्या सिंधुदुर्गात दाखल होण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.तसेच जूनच्या सुरुवातीला मान्सूनपुर्व पाऊस राज्यात सक्रिय होणार आहे. त्याप्रमाणे आज २ जून रोजी दक्षिण पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, धाराशिव, लातूर, नांदेडमध्ये पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. तर ३, ४ आणि ५ जून रोजी मध्य महाराष्ट्रातील अहमदनगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, बीड, जालन्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.तसेच ६, ७ आणि ८ जून रोजी अरबी समुद्रात देखील एक प्रणाली सक्रिय होणार आहे. सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी, ठाणे, मुंबई, पालघरच्या काही भागात तीन दिवस ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २ जून ते ८ जून अनेक भागात पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे.



## उदगीर येथील शंकर माध्यमिक आश्रम शाळेचे दहावीचा निकाल ९४.२५ टक्के



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**


गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित शंकर माध्यमिक आश्रमशाळा, बोरतळा पाटी , महादेव मंदिर, देगलूर रोड उदगीर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे द्वारा घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत उज्वल यशाची निकालाची परंपरा कायम राखत या वर्षीचा निकाल ९४.२५ टक्के लागला आहे.शंकर माध्यमिक आश्रम शाळेतून सर्व विद्यार्थ्यांमधून वाघमारे सुमित सुनील ९०% हा विद्यार्थी प्रथम आला आहे, खुशाल मोतीराम हा विद्यार्थी ८८.६०% घेऊन व्दितीय तर कळसे विठ्ठल धोंडीबा हा विद्यार्थी ८६.६० टक्के घेऊन तृतीय आला आहे. यासह अनेक विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन गुणाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापूराव राठोड व सचिव अमित राठोड , मुख्याध्यापिका शेरे टी.बी. स्वामी एस.जी. यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## शॉर्ट सर्किटमुळे मेडिकल दुकान जळून खाक ; ६४ लाखाचे नुकसान

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार शहरातील बसस्थानक ते महाराणा प्रताप चौक या मुख्य रस्त्यावरील भवानीनगर कमानीसमोर असलेल्या भक्ती मेडीकलच्या होलसेल न्ड रिटेलर औषधी दुकान अमोल यदुराज गबाळे यांचे रिटेल तर आशिष संजय गबाळे यांचे होलसेल असे दोन्ही मेडीकल स्टोअर्स एकाच ठिकाणी दोन मजली इमारतीत आहेत,दुकानाला शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत दुकानांची राखरांगोळी झाली.तर अन्य एका ऐश्वर्या साडी सेंटर दुकान काही प्रमाणात जळाल्याची घटना दि.०२ जुन रोजी रविवारी सकाळी ८:३० च्या सुमारास घडली.तब्बल पावणे दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली,मिळालेल्या माहितीवरून यात ६४ लाखाचे नुकसान झाले,असून याबाबत कंधार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यात आली आहे.



शहरातील मुख्य रस्त्यांवर असलेल्या भवानी नगरच्या कमानीसमोर लागलेल्या आगीत भक्ती मेडिकलचे गोडाऊन व दुकान जळून खाक झाले असून ६१ लाख ५० हजाराचे नुकसान झाले तर ऐश्वर्या साडी सेंटर दुकानाचे १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले.असे एकूण ६४ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यात जीवितहानी मात्र झाली नाही. कंधार पोलीस स्टेशनचे होमगार्ड मदतीला धावून आले असे प्रथमदर्शी नागरिकांकडून सांगण्यात आले. पण अग्निशमन पथक मात्र उशीरा पोहोचले अन् आगीवर नियंत्रण मिळविले. सकाळी आठ ते सव्वा आठच्या दरम्यान मुख्य रस्त्यावरील भक्ती मेडिकल दुकानातून अचानक धूर आणि आग दिसू लागलं.या मार्केटमध्ये जवळपास पंधरा दुकाने आहेत.याची सुरुवात भक्ती मेडिकल दुकानापासून झाली. त्यानंतर ऐश्वर्या साडी सेंटर दुकानापर्यंत पोहोचली. यामध्ये मेडिकल जळून खाक झाले आहेत,तर कपड्यांच्या दुकानाचेही काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

या आगीची माहिती उपस्थित प्रदिप व्यास,परशुराम केंद्रे काही जणांनी अग्निशमन दल,नगरपालिका व तहसीलदार यांना फोनवरुन दिली.पण कंधार पालिकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांनी फोन रिसीव्ह केला नाही.त्यांनतर उशीराने लोहा नगरपालिकेचे अग्निशमन दल तिथे पोहोचले.त्यांनी आग आटोक्यात आणली.कंधार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांच्यासह अनेक पोलिसांनी घटनास्थळ गाठले. पोलीस स्टेशनच्या होमगार्डच्या मेहनतीमुळे व अग्निशमन दलाच्या मेहनतीमुळे ही आग आटोक्यात आली. या आगीमध्ये मेडिकल, कपड्याचे दुकान असे एकूण जवळपास ६४ लाखाचे नुकसान झाले असून शॉर्टसर्किटमुळेच आग लागली असल्याचा अंदाज बांधण्यात आला आहे.याबाबत कंधार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली असून पुढील तपास व्यवहारे हे करीत आहेत.




# भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी दिग्विजय जेधे ; निमंत्रकपदी सागर फडके, सहनिमंत्रकपदी मोहन जाधव

## राज्यस्तरीय तिसरे संमेलन १६ व १७ जून रोजी चौफुला येथे होणार !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**दौंड । बबनराव धायतोंडे**

अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान आयोजित चौफुला (ता.दौंड) येथे होणा-या तिसऱ्या राज्यस्तरीय भीमथडी मराठी संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी दिग्विजय जेधे यांची तर निमंत्रकपदी सागर फडके व सहनिमंत्रकपदी मोहन जाधव यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संमेलनाचे मुख्य प्रवर्तक ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली.

तिसरे राज्यस्तरीय भीमथडी मराठी साहित्य संमेलन दि.१६ व १७ जून २०२४ रोजी होणार आहे. संमेलनाच्या संयोजन बैठकीला भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सोनवणे, सचिव दीपक पवार, राजाभाऊ जगताप, कैलास शेलार,डॉ.भालचंद्र सुपेकर,रवींद्र खोरकर,सुशांत जगताप, बाळासाहेब मुळीक,अरविंद जगताप, रामभाऊ नातू, राहुल यादव उपस्थित होते.

भीमथडी साहित्य संमेलनात ग्रंथदिंडी, जलाभिषेक, उद्घाटन समारंभ, पुरस्कार वितरण, कथाकथन, नाट्यप्रयोग,परिसंवाद, कलारंग,कविसंमेलन व समारोप असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत अशी माहिती अध्यक्ष संजय सोनावणे यांनी दिली.

दिग्विजय सर्जेराव जेधे हे देशभक्त केशवराव जेधे फाउंडेशन चे अध्यक्ष असून, हे बारामतीचे पहिले खासदार स्वातंत्र्यसैनिक देशभक्त केशवराव जेधे यांचे पणतू असून केशवराव जेधे यांच्या स्वतंत्र्यपूर्व काळातील देशासाठी योगदान, त्यांनी सुरू केलेल्या चळवळी, सत्यशोधक कार्याचा प्रचार आणि प्रसार या संस्थेच्या मार्फत ते करत आहेत. दिग्विजय जेधे हे सिंहगड राजगड तोरणा या सह्याद्रीच्या पराक्रमी गडांवर होणारी महाराष्ट्रातील पहिली आंतरराष्ट्रीय अल्ट्रा ट्रेल मॅरेथॉन चे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. गेली ७ वर्ष ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचा प्रचार व प्रसार सा मॅरेथॉनच्या माध्यमातून करत आहेत. स्वराज्यावर अफझलखान चालून आला त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी स्वतःच्या वतनावर पाणी सोडणारे स्वराज्य वीर कान्होजीराव जेधे यांचे ते १३ वे वंशज आहेत. गेली १५ वर्ष अविरतपणे शिवकार्य, समाजकार्य ते करत आहेत. आग्रा ते राजगड - गरूडझेप मोहिम - १७ ऑगस्ट १६६६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या कैदेतून स्वतःची सुटका करून घेतली व ते राजगडावर सुखरूप आले. त्या घटनेला मानवंदना देण्यासाठी ४ राज्यांतून हातामध्ये धगधगती शिवज्योत घेऊन आग्र्याच्या लाल किल्ल्यापासून ते स्वराज्याची राजधानी राजगडपर्यंत सुमारे २००० युवक १२५३ किलोमीटर १३ दिवसांत धावत आले. जेधे हे गरूडझेप मोहिमेचे उपाध्यक्ष आहेत. ही मोहिम भारतातील आजपर्यंतची सर्वात मोठी शिवज्योत आहे. सागर फडके हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) दौंड तालुका युवक अध्यक्ष आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी प्रदेश सरचिटणीस स्व.नानासाहेब फडके यांचे हे सुपुत्र आहे. सागर फडके हे तालुक्यात तरुणासाठी नेहमी सक्रीय असतात. मोहन जाधव हे महाराष्ट्र राज्य कैकाडी महासंघाचे उपाध्यक्ष म्हणून काम करत आहेत. साहित्य चळवळीत सक्रिय सहभाग नेहमी घेत असतात.


दिग्विजय जेधे


सागर फडके


मोहन जाधव

## पोलिसांच्या झाडाझडतीने बस प्रवाशांना मनस्ताप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मोबाईल चोरीला गेल्याने एसटीत चढलेल्या तरुणीने आकांडतांडव केले. त्यामुळे धावती बस पोलिस ठाण्यात वळती करण्यात आली. त्याठिकाणी पोलिसांच्या झाडाझडतीने असंख्य प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागल्याची घटना शनिवारी सकाळी घडली.याशिवाय तब्बल पाऊण तास एसटीचा खोळंबा झाल्याने एकच खळबळ उडाली.



राज्य परिवहन महामंडळाची बस क्रमांक एमएच-०४, एस-८१९४ ही मलकापूर आगारातून खान्देशातील कुऱ्हा गावाकडे निघाली. शहरातील तहसील चौकात पहिल्या थांब्यावर शनिवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास नम्रता निनाजी शिंगोटे ही तरुणी चढली. रेल्वे पुलाखालून मुक्ताईनगर रस्त्यावर पुढे जात असतानाच त्या तरुणीने तिच्या जवळचा मोबाईल गायब झाल्याचा आरडाओरडा करत आकांडतांडव केले.

डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या थांब्यावर गाडी थांबवून वाहक दीपक भीमराव लोखंडे यांनी नम्रता शिंगोटे हिची विचारपूस केली. त्यांनी संबंधित नंबरवर फोन लावला, तो रिसीव्ह झाला नाही. मग त्यांनी तरुणीची समजून काढण्याचा प्रयत्न केला; मात्र ती ऐकायलाही तयार नसल्याने वाहकाने एसटी पोलिस ठाण्यात वळविण्याचे चालकाला सांगितले.पोलिस ठाण्यात एसटीतील ५० ते ५५ आबालवृद्ध प्रवाशांची डीबी पथकाने झाडाझडती घेतली, परंतु मोबाईल आढळून आला नाही. त्यानंतर पोलिसांनी दमदाटी देखील केली. तब्बल ३० मिनिटांच्या झाडाझडती नंतर एसटीच्या नोंदी घेण्यात आल्या. निर्धारित मार्गावर एसटी रवाना झाली. यात प्रवाशांना मात्र अनाठायी मनस्ताप सहन करावा लागला. त्यातल्या त्यात कुठल्याही प्रकारची चूक नसताना एसटीचा तब्बल पाऊण तास खोळंबा झाला.

## मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने पाणपोईचे उद्घाटन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मागील वर्षापेक्षा यावेळी उन्हाची तीव्रता वाढत चालली असून येत्या जून महिन्यात ही तीव्रता अधिक होण्याची शक्यता आहे. यामुळे नागरिकांची तहान भागविण्यासाठी पोलिस अधिक्षक मा. सुनील कडासने साहेब यांच्या संकल्पनेतून संदीप काळे मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते सार्वजनिक पाणपोई सारख्या सुंदर उपक्रमाचा लोकार्पण सोहळा सर्व नागरिकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा झाला.



**पाणी आहे अमृततुल्य, पाण्याचे महत्व अतुल्य..!**

**लय पुण्याचं हे असे काम पाणपोईचे अमुल्य दान, सात जन्माचं मिळे पुण्य मुक्या जीवाची भागे तहान..**

**संदीप काळे पोलीस निरीक्षक मलकापूर ग्रामीण**

तहानलेल्याची तहान भागविणे ही आपली संस्कृती आहे. काही वर्षांपूर्वी सामाजिक संस्था, संघटना, सामाजिक कार्याची जाण ठेवत रस्त्यालगत, बसस्टॉप अथवा सार्वजनिक ठिकाणी पाणपोई उभारून वाटसरूंची तहान भागत असे. उन्हाळ्यात यावर अधिक भर दिला जात असे. यावेळी मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या ग्राम उमाळी व दाताळा येथे बस स्थानकावर मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने नागरिकांसाठी पाणपोई सुरू करण्यात आली सदर कार्यक्रमाला मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप काळे , पो.हे.का सचिन दासर पो.का संदीप राखोंडे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# संघर्षाचे शिलेदार लोकनेते गोपीनाथराव मुंढे

लोकनेता न्युज नेटवर्क

३ जुन २०२३ लोकनेते गोपीनाथराव मुंढे साहेबांचे १० वे पुण्यस्मरण साहेबांना जाऊन १० वर्ष उलटली तरी देखील साहेब आपल्यामधून गेलेत अस वाटत नाहीत. साहेब ते तमाम महाराष्ट्र वाशियांच्या मनात जीवंत आहे. आणि साहेबांनी निर्माण केलेल्या या अस्तित्वाला केव्हाही इजा पोहचणे शक्य नाही. महाराष्ट्राच्याच नाहीतर देशाच्या राजकारणात सन्मानाने घेतल्या जाणार नाव लोकनेते गोपीनाथराव मुंढे साहेब. सर्व प्रथम सर्वांना एक प्रश्न पडत असेल मी जेव्हा १७ वर्षाचा होतो तेव्हा पासून मी अनेक वेळा साहेबांच्या जयंती पुण्यतिथि निम्मित लेख लिहले पण कुठेही स्वर्गीय हा शब्द मी वापरला नाही कारण असे की साहेब हे माझा साठी त्यांच्या विचाराने जीवंत आहे. मृत्यू हा अटळ आहे पण नियतीने जो घात केला ते दुख केव्हाही विसरता येणार नाही.



३ जून २०१४ ची सकाळ जून म्हणल की पावसाळ्याला सुरुवात होणार, विजा वार हा दिवस चांगलाच माझा आठणीत आहे. मी नेहमी प्रमाणे सकाळी सकाळी बिस्किट आणण्यासाठी दुकानात गेलो दुकाना समोर मानस उभी होती, पण येतांना त्यांच्या बोलण्याने माझ लक्ष वेधून घेतलं आणि मी ऐकलं की साहेब गेलेत त्याच क्षणी डोळ्यांना धारा लागल्या. मी पळतच घरी गेलो आणि आई ला म्हणल आई मुंढे साहेबांच्या अपघात झाला आणि साहेब गेलेत. त्या वेळेस या गोष्टीवर कोणाचा विश्वास बसत नव्हता कारण त्या वेळेस मी केवळ १२ वर्षाचा होतो. आणि तेव्हा मोबाइल पण काहीच जणांकडे होते. पण अस असल तरी काहीच वेळात ही बातमी वार्या सारखी संपूर्ण देशभरात पोहचली. अचानक झाल तरी काय हे सगळ्याच्या डोक्यात विचार फिरू लागले त्या नंतर साहेबांना परळीला आणण्यात आल तेथे साहेबांवरअंत्यसंस्कार झाले. आणि २-३ दिवस उलटत नाही तर निधनाचे वेगवेगळे कारण समोर येऊ लागले. पण या कारणांना काहीच तथ्य नव्हते जनसामान्य माणसासाठी देव असलेले साहेब या जगातून गेले त्या नंतर हे निश्च राजकारणी शेतकर्यांना जगू देतील अस मला तेव्हाही वाटलं नव्हतं.

नेता कसा असावा किंवा नेता काय असतो ते तुम्हाला साहेबांच्या जीवन प्रवासातून कळालेल आहेच. ज्या वेळेस राजकारण काय असत किंवा नेता काय असतो हे देखील मला कळत नव्हतं त्या वेळेस मी साहेबांना बोलताना बघितलं होत की मी मोडेल पण वाकणार नाही, आणि मरेल पण झुकणार नाही भगवानगडावरील दसरा मेळाव्यातील हे वाक्य मी ऐकले होत साहेबांची ती बोलण्याची शैली सर्वांना आपलास करणारी होती. पण त्या वेळेला मला कधी वाटलं नव्हतं की माझा आयुष्यातील साहेबांना बघितलेला शेवचा दिवस असेल. काही गोष्टी ह्या वेळ ठरवत असते पण आहे त्या आयुष्यात कस जगायच हे नक्कीच आपण ठरवू शकतो.



**ज्ञानेश्वर सुरेश बुधवत**
**मुख्यसंपादक दैनिक लोकनेता**
**संस्थापक - विश्व फाउंडेशन म. राज्य**
**मातृतीर्थ सिंदखेड राजा**
**मो. न. ९९६०२०९१४९**

साहेबांच्या जीवनावर बोलावं एवढेही आपण मोठे नाही. पण आजच्या तरुण पिढीला साहेब केवळ विचारात ठेवून नव्हे तर साहेबांनी ज्या शेतकर्यांसाठी आपल आयुष्य अर्पण केल त्या सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नावर बोलण्यासाठी साहेबांचा आदर्श घ्यायला हवा. केवळ निश्च नेत्याच्या माघे फिरून त्यांना आपले माय बाप मानून आपल्या माय-बापाचे आयुष्य सुखी होणार नाही. करायचं तर लोकनेते मुंढे साहेबांचा आदर्श डोळ्या समोर ठेवा. कार्यकर्त्याला नेता करणारे महाराष्ट्रातील आनंद दिघे व गोपीनाथ मुंढे हे २ च नाव आहेत.

मुंढे साहेबांनी संपूर्ण आयुष्य गोरगरीब जनतेसाठी समर्पित केल बीड जिल्हयामध्ये ऊसतोड कामगार हे बिकट परिस्थिति मध्ये न्याण माघणार तरी कोणाकडे पण साहेबांनी त्यांच्यासाठी अनेक वेळा आवाज उठवला. संघर्ष हा मनापासून असावा लागतो. आज सुद्धा एक वाक्य एकलेल मला आठवतय की मुंढे साहेबांचा शेतातील उस हा बेभाव विकत होता म्हणून तो शेतामध्ये तसाच उभा होता त्या वेळेस साहेब म्हणले होते की आज आपला उस कारखान्यावाले घेत नसले तर एक दिवस आपला ऊसाचा कारखाना असेल आज साहेब नसले तरी साहेबांचा आत्मा परळी वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना उभा आहे.

साहेबांचा संघर्ष हा नेहमी मागासलेल्या समाजासाठी होता. राजकीय क्षेत्रात पक्षातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यान सोबत मैत्रीचे संबंध होते. साहेबांच्या आयुष्यात आलेला माणूस हा नेहमी साहेबांच्या विचारणी पेरित होऊन जायचा. साहेबांना राजकीय जीवनात प्रवास करतांना शून्यातून वरती याव लागलं. या मध्ये अनेक विरिधकांना साहेबांनी तोंड दिल, राजकारण म्हणल की विरोधक येतातच पण विरोधकांना आपलस करण हे नेहमी साहेबांच्या मनात असायचं. केवळ भाषणात बोलूनच नव्हे तर शेतकर्यांच्या शेतात जाऊन साहेबांनी शेतकर्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. महाराष्ट्रातील जनतेला मायेने हाक देणारा एकमेव नेता म्हणजे मुंढे साहेब...

२०१४ च्या निवडणुकीमध्ये साहेबांचे सरकार आले सहबांनी केंद्रीय ग्राम विकास मंत्री पदाची शपथ घेतली. आणि ३ जून ला परळी मध्ये भव्यदिव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. पण नियतीचा किल्ल्या ह्या आपल्या हातात नसतात. याच दिवशी साहेबांवर काळाने घात केला. जनसामन्याचा नेता महाराष्ट्रवासीयांना सोडून गेला. महाराष्ट्रावर आलेले हे मोठे संकट होत. गोरगरिबांचा देव चोरला गेला. आज साहेब आमच्यात नसले तरी तुमच्या विचारांनी तुम्ही आमच्या सोबत आहे... इतिहास रचून सातासमुद्रापार गेलात साहेब....जातांना महाराष्ट्रातील प्रत्येक घरामधील देवा जवळ तूम्ही जागा निर्माण करून गेले..

साहेब.......
देऊन गेलात तुम्ही
आम्हा आभाळभर माया
त्याच आभाळभर मायेत
भासते तुमच्या शब्दाची छाया
साहेब सदैव आठवणीत...!!!

लोकनेते गोपीनाथराव मुंढे साहेबांच्या पुण्यस्मरणा निम्मित विनम्र अभिवादन....

## जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करत गर्दी केल्याप्रकरणी दोनशेहून अधिक जणांविरुद्ध गुन्हा दाखल



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

अविश्वास ठराव विशेष बैठक सभागृहाबाहेर चांगलीच गाजली. शुक्रवारी दगडफेक व हुल्लडबाजीत सौम्य लाठीचार्ज झाला. त्यात तीन पोलिस जखमी झाले. जमावबंदी कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी भाजपच्या दोन्ही गटांतील दोनशेहून अधिक जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

माजी आमदार चैनसुख संचेती यांना आरोपी करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे.मलकापुरात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवचंद्र तायडे यांच्या विरोधात अविश्वास प्रस्तावावर चर्चेसाठी विशेष बैठक ३१ मे रोजी आयोजित होती. त्या निमित्ताने उपविभागीय दंडाधिकारी मलकापूर यांच्या आदेशानुसार बाजार समिती उपबाजार परिसरात कलम १४४ (१) अन्वये जमावबंदीचा आदेश होता. त्यात नांदुरा रस्त्यावर तहसील चौक ते रामवाडी परिसर अशा मर्यादा निश्चित केल्या होत्या. दरम्यान, ३१ रोजी सकाळी १०:४५ वाजताच्या सुमारास जिल्हा बँकेसमोर गैरकायद्याची मंडळी जमवून काहींनी संचालक मंडळ बसलेल्या लक्झरी बस (एमएच १२ यूएम ७२११) हे वाहन घोषणा देत अडविले. गाडीवर धक्काबुक्की केली. तेवढ्यात दगडफेक केली. त्यात शेख फैजल शेख खलील, सचिन संजय कवळे, प्रकाश भगवान जाधव हे पोलिस कर्मचारी जखमी झाले.याप्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक ईश्वर वरगे यांच्या फिर्यादीवरून विजय कडू पाटील, अजय पुरुषोत्तम तायडे, केशव गारमोडे, चंद्रशेखर रमेश तायडे, शंभू शिवचंद्र तायडे, अमोल वामनराव तायडे, राजू मधुकर तायडे, सागर मनोज जैस्वाल, राहुल घाटे आदींसह २०० जणांविरुद्ध कलम १८८, ३४१, १४३, १४७, १४९ भादंवि तसेच १३५ मुपोकाप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तपास राहुल वरारकर करीत आहेतजमावबंदी कायद्याचे उल्लंघन करून बाजार समितीच्या प्रवेशद्वारावर घोषणा दिल्या. पोलिस अधिकाऱ्यांनी माजी आमदार व त्यांच्या समर्थकांना शांतता भंग करू नका, असे आवाहन केल्यानंतरही त्यांनी गोंधळ सुरू ठेवला. याप्रकरणी मनोज उमाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चैनसुख संचेती, यश सुरेशकुमार संचेती, राहुल ऊर्फ बबलू देशमुख, अतुलसिंह प्रतापसिंह राजपूत, संदीपसिंह नारायणसिंह राजपूत, शुभम संजय काजळे, ऋषिकेश ज्ञानदेव वाघोदे, करणसिंह राजपूत, चंद्रकांत वर्मा असे ९ व १५ ते २० बाउन्सर (खासगी अंगरक्षक) अशा २९ जणांविरुद्ध कलम १४३, १८८ भादंवि व मुपोका १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलिस उपनिरीक्षक मुसळे करीत आहेत.

# लोकसभा निवडणूक मतमोजणीसाठी लातूर प्रशासन सज्ज मत मोजणी केंद्रात मोबाईल,इलेक्ट्रॉनिक वस्तू आणण्यास सक्त मनाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**

लातूर लोकसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या सहा विधानसभा क्षेत्रनिहाय मतमोजणी फेऱ्यामध्ये सर्वाधिक २८ मतमोजणी फेऱ्या लातूर शहर विधानसभा मतदारसंघात होतील. अहमदपूर विधानसभा मतदारसंघात २७, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात २६, निलंगा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात २५ आणि उदगीर व लोहा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात प्रत्येकी २४ मतमोजणी फेऱ्या होणार आहेत. तसेच टपाली मतमोजणीची १ फेरी होणार आहे. एकूण लोकसभा मतदारसंघाचा विचार करता मतदान यंत्रातील मतमोजणीच्या २८ आणि टपाली मतमोजणीची १ फेरी झाल्यानंतर अंतिम निकाल घोषित केला जाईल. मतदान यंत्रावरील प्रत्येक फेरीला अंदाजे २० मिनिटे ते ३० मिनिटे लागण्याची शक्यता आहे. मतमोजणी केंद्र परिसरात स्वतंत्र मिडिया सेंटर तयार करण्यात आले असून भारत निवडणूक आयोगाकडून प्राधिकरपत्र (पासेस) दिलेल्या प्रसारमाध्यम प्रतिनिधींना याठिकाणी प्रवेश दिला जाणार आहे. प्रत्येक फेरीचा उमेदवारनिहाय मतांची आकडेवारी याठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी दोन स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. शासकीय महिला तंत्रनिकेतनच्या पूर्वेकडील बाजूच्या प्रवेशद्वारातून प्रसारमाध्यम प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच जनतेसाठी मतमोजणी केंद्राबाहेरील ध्वनिक्षेपकाद्वारे फेरीनिहाय उमेदवारांना मिळालेल्या मतांची माहिती दिली जाणार आहे.मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तू घेवून येण्यास मनाई मतमोजणी केंद्रात मोबाईल, कॅमेरा, लॅपटॉप, आयपॅड, तसेच इतर कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तु नेण्यास मनाई करण्यात आला आहे. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनासुध्दा केवळ मिडीया सेंटरमध्येच मोबाईलचा वापर करता येईल. प्रत्यक्ष मतमोजणी केंद्रात जातांना मोबाईल मिडीया सेंटर येथे जमा करावा लागेल. मतमोजणी केंद्र परिसरात तगडा बंदोबस्त मतमोजणी केंद्राच्या परिसरात सुरक्षेच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे. केंद्रीय राखील पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि लातूर जिल्हा पोलीस आणि गृहरक्षक दलातील जवानांचा यामध्ये समावेश राहणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या नेतृत्वात ६ पोलीस उपाधीक्षक, १३ पोलीस निरीक्षक, ४८ सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, ४६० पोलीस जवान, दंगा विरोधी दलाच्या ३ तुकड्या, शीघ्र कृती दलाची १ तुकडी, गृहरक्षक दलाचे ३०० जवान यांच्यासह राज्य राखीव पोलीस दल आणि केंद्रीय पोलीस दलाची तुकडी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आली आहे. मतमोजणी केंदाच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू लातूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून, २०२४ रोजी शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन, बार्शी रोड, लातूर येथे सकाळी ८ पासून सुरु होणार आहे. या मतमोजणी केंद्राच्या २०० मीटर परिसरात ४ जून २०२४ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे.



## पोलीस ठाणे सेनगाव जिल्हा हिंगोली तर्फे नागरिकांना जाहीर आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

पोलीस ठाणे सेनगाव जिल्हा हिंगोली हद्दीतील सुजाण नागरिकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक ०६/०६/२०२४ रोजी पावेतो आदर्श आचारसंहिता अंमलात असून हिंगोलीसह संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल दिनांक ०४/०६/२०२४ रोजी जाहीर होणार असून त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की १.कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या,जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करू नयेत २.कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये,डीजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाहीत.तसेच विनापरवाना विजयी मिरवणूक काढू नये ३.व्हाट्सअप ग्रुपचे डमिन यांनी दिनांक ०३/०६/२०२४ ते दिनांक ०६/०६/२०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये `पश्रू रवाळप करून बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुप मधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुप वर टाकणार नाहीत ४.जर ऍडमिन यांनी सेटिंग मध्ये बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप डमिनला जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी असे यावेळी सेनगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी सांगितले.



## इरा पब्लिक स्कूलमध्ये दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

न्यू इरा पब्लिक स्कूल मध्ये दहावी च्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

न्यू इरा पब्लिक स्कूल मध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या संचालिका प्रा. वर्षा क्षीरसागर या होत्या. तर व्यासपीठावर सुधाकरराव विटेकर, संस्थेचे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, मुख्याध्यापिका अश्विनी कुलकर्णी यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेतून प्रथम आलेली आकांक्षा पिसाळ, द्वितीय खान आरमान व तृतीय सृष्टी तवले या विद्यार्थ्यांचा पालका सह सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर विशेष प्राविण्यासह उतीर्ण झालेल्या इतर विद्यार्थ्यांचाही पालकासह सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना सुधाकर विटेकर म्हणाले की काही वर्षांपूर्वी दहावीच्या परीक्षेमध्ये ६०, ७० टक्के गुण घेणारे विद्यार्थी फार यशस्वी समजले जायचे. त्यांचे गावागावात सत्कार व्हायचे, मात्र आता स्पर्धा वाढली आहे. ९९ ते १०० टक्क्या पर्यंत गुण



विद्यार्थी घेत आहेत. फार मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. आपले अस्तित्व स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठे कष्ट करण्याची गरज आहे व स्पर्धेत टिकून यशस्वी व्हावे अशी अपेक्षा यावेळी सुधाकर विटेकर यांनी व्यक्त केली. यावेळी बोलताना प्रा. वर्षा क्षीरसागर म्हणायला की, विद्यार्थ्यांचा कल, आवड ओळखून त्यांनी आपले पुढील क्षेत्र निवडावे. पालकांनी विद्यार्थ्यांची आवड ओळखून त्यांना पुढील क्षेत्र निवडण्याची संधी द्यावी. त्यांच्यावर आपले स्वप्न लादण्याचा प्रयत्न करू नये. ते केल्यास ते किती यशस्वी राहतील हे सांगता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची आवड ओळखून त्यांना आपले क्षेत्र निवडण्याची संधी द्यावी असे आव्हान प्रा. वर्षा क्षीरसागर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली जोशी यांनी केले तर आभार नानासाहेब कडू यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैशाली राजूरकर, सुमया पठाण, माधुरी तौर, मनीषा शिंदे, लक्ष्मीकांत सराफ आदींसह शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## कारसेवक देवेंद्र फडणवीस यांनी अयोध्येत घेतले रामललांचे दर्शन

### वाराणसीत काशी विश्वनाथाचे दर्शन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अयोध्या । प्रतिनिधी**

श्रीरामजन्मभूमी आंदोलनात तिन्ही कारसेवांमध्ये सहभाग नोंदविणारे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अयोध्येत प्रश्रूश्रीरामचंद्रांचे दर्शन घेतले आणि आपल्या भावना व्यक्त केल्या. तत्पूर्वी आज सकाळी त्यांनी काशीत काशी विश्वनाथाचे दर्शन घेतले.अयोध्येत रामललांचे दर्शन घेतल्यानंतर श्री रामजन्मभूमी न्यासाच्या पुस्तिकेत देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या संदेश पुस्तिकेत त्यांनी लिहिले की, ज्या रामाच्या मंदिर पुननिर्माणात कारसेवक म्हणून सेवा देण्याची संधी मला मिळाली, त्याच मंदिराचे पुननिर्माण झाल्यानंतर प्रत्यक्ष रामललांचे दर्शन घेण्याची संधी सुद्धा मला मिळाली, हे माझे परमभाग्य आहे. मी रामललांचे खूप खूप आभार मानतो. राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या या यज्ञात आहुती देणार्या सर्वांना मी नमन करतो. विशेषत्वाने पंतप्रधान नरेंद्र मोदी, या न्यासाचे सर्व विश्वस्त आणि मंदिर निर्माणातील विश्वकर्मांच्या दुतांना मी प्रणाम करतो. जय श्रीराम. अयोध्येतील राममंदिरात दर्शन घेतल्यानंतर बाहेर त्यांनी बांधकाम कामगारांसोबत छायाचित्र सुद्धा काढून घेतले आणि महाराष्ट्रातून दर्शनासाठी आलेल्या बंधू, भगिनींच्या भेटीसुद्धा घेतल्या. देवेंद्र फडणवीस यांना पाहताच या मराठी बांधवांनी '४०० पार-मोदी सरकार' असे नारे दिले. देवेंद्र फडणवीस यांनी अयोध्येत हनुमान गढी मंदिरात सुद्धा दर्शन घेतले.राममंदिरात दर्शन घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राममंदिर नव्याने उभारल्यानंतर दर्शनाची प्रचंड ओढ होती. ३ वेळा कारसेवक आणि अनेकदा रामसेवक म्हणून अयोध्येत आलो.



लातूर जिल्ह्यातील बाभळगाव येथे राज्याचे माजी वैद्यकिय शिक्षण मंत्री तथा आ. अमितभैय्या देशमुख यांची काँग्रेसचे युवा नेते श्रीकांत पाटील यांनी सदिच्छा भेट घेऊन अनेक विषयांवर चर्चा केली.यावेळी उदगीर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष कल्याण पाटील सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.(सुनिल बस्वराज हावा -लोकनेता न्युज नेटवर्क)



पाटोदा तालुका पत्रकार संघाचे प्रेस फोटोग्राफर संघ तालुकाध्यक्ष सखाराम भोसले यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देताना. पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, प्रा.संजय राख सर, अतुल शिंदे सर, प्रा.घोलप सर, जितेंद्र भोसले यांच्या सह इतर (छाया:- लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा)

## लोकसभा निवडणूक मतमोजणीच्या अनुषंगाने पाटोदा पोलीसांचे नागरिकांना आवाहन

### सौताडा,वाघिरा येथे शांतता कमिटीचे सदस्य,तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांची शांतता बैठक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

दिनांक ०४ जून-२०२४ रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणूक मतमोजणीच्या अनुषंगाने पाटोदा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे सौताडा आणि वाघिरा या गावांमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.धाराशिवकर साहेब, पोलीस स्टेशन पाटोदा चे प्रभारी अधिकारी श्री.अनमोल केदार यांनी शांतता कमिटीचे सदस्य, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांची शांतता बैठक घेऊन लोकसभा निवडणूक मतमोजणीच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी शांतता राखावी व प्रसार माध्यमांचा चुकीचा वापर करू नये, व्हाट्सअँप ग्रुप वरती तसेच फेसबुक पेज वरती आक्षेपार्ह पोस्ट करू नये, कोणत्याही जातीबद्दल किंवा धर्माबद्दल आक्षेपार्ह विधान किंवा फोटो पोस्ट करू नये, जो कुणी अशा प्रकारचे कृत्य करेल



त्याच्या वर प्रशासन गुन्हे दाखल करून कडक कायदेशीर कारवाई करणार आहे असे सांगितले. तसेच या बाबत सर्व नागरिकांना योग्य त्या सूचना दिल्या व या पूर्वी निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर ज्या इसमानी सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केली, तसेच ज्याने ती प्रसारित केली व ज्या व्हाट्सअँप ग्रुप वर प्रसारित झाली त्या २ ग्रुप डमिन वर देखील कडक कायदेशीर कारवाई पाटोदा पोलिसांनी केली आहे. आणि या पुढे देखील जो कोणी इसम सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करेल त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करणार असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकार साहेब यांनी या वेळी बैठकीत सांगितले. तसेच बैठकीत सूचित केलेल्या प्रमाणे विविध गावात विविध व्हाट्सअँप मधील ग्रुप अँडमिन वर कारवाई टाळायची असेल तर अशा संभ्रमच्या वातावरणात प्रत्येक ग्रुपचे डमिन यांनी आपल्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये जाऊन ओन्ली अँडमिन सेटिंग करावी जेणेकरून कोणीही कोणती ही आक्षेपार्य पोस्ट ग्रुप मध्ये व्हायरल करणार नाही. तसेच ग्रुप मधील सदस्यांकडून चुकून देखील अशी अप्रिय पोस्ट व्हायरल होणार नाही. या बाबत ही मार्गदर्शन केले. आणि या प्रसंगी अशा प्रकारचे सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणार नाही अशी ग्वाही गावकरी यांनी पोलिसांना दिली. सौताडा आणि वाघिरा ठिकाणी मोठ्या संख्येने गावातील प्रतिष्ठित नागरिक हजर होते. या दोन्ही मिटींगचे आयोजन पाटोदा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री.अनमोल केदार यांनी केले असून पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री.माधव काटकर, पोलीस हवालदार श्री.मच्छिंद्र उबाळे, श्री.सचिन जायभाय, श्री.गहिनीनाथ गर्जे, पोलीस अमलदार भागवत खूपसे, सचिन कोळेकर, रियाज पठाण, भरत कोळेकर हजर होते.

## दुष्काळाची दाहकता: बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात सव्वा दोन लाख पशुधन संकटात

### चारा व पाणीटंचाईचे दुहेरी टंचाई : जनावरांची कवडीमोल दराने विक्री

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

अपुऱ्या पावसामुळे वाया गेलेला खरीप व रब्बी हंगाम, पाणी व चाराटंचाईच्या दुहेरी संकटाने तीव्र दुष्काळी परिस्थिती ओढावली. यामुळे आष्टी तालुक्यात वैरणीची टंचाई निर्माण झाली आहे.माहिती नुसार २लाख ३२ हजार ०४ आहेत चारा व पाणी टंचाई मुळे जनावरे संकटात सापडली आहेत. लोकसभेच्या आचारसंहितेमुळे चारा छावण्या सुरू नाहीत. त्यामुळे जनावरे सांभाळणे परवडत नसल्याने त्यांना बाजार दाखविण्याशिवाय पर्याय नाही. तर दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांचे बाजार कमी होऊन कवडीमोल दराने विक्री करावी लागत आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी व पशुधन संकटात सापडले आहे.दुष्काळी आष्टी तालुक्यात शेती परवडत नसल्याने जोड व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय म्हणून संकरित गायी, म्हशी, शेळ्या मेंढ्या पालन केले जाते. परंतु सध्या तालुक्यात सरासरी ४२ अंश सेल्सिअस एवढे उच्चांकी तापमान आहे. हे तापमान दुभत्या म्हशी-गाई जनावरांना जीवघेणा ठरू लागला आहे. खरीप



**१९७२ पेक्षा गंभीर परिस्थिती..**

यावर्षी १९७२ पेक्षा गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. चारा व पिण्याचे पाणी कोठून द्यायचे, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर पडला आहे. दुभती जनावरे संकटात सापडली आहेत. वैरण विकतच आणून घालावी लागत आहे. वैरणी दरात वाढ झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे

**श्री. दत्तात्रय सोनवणे,पशुपालक शेतकरी**

व रब्बी हंगाम कमी जास्त पावसाअभावी वाया गेला आहे. त्यामुळे चारा संपला आहे. चाऱ्याअभावी शेतकऱ्यांना जनावरे जगविणे कठीण झाले आहे.

# अनाधिकृत होर्डिंग्ज धारकांना सीईओ निता अंधारे यांचा वरदहस्त उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालयाला तक्रार-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



मुंबईच्या घाटकोपर येथील होर्डिंग्ज दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालयाने बीड नगर परिषदेला शहरातील लेखी पत्र पाठवून शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज हटविण्याचे संबंधित प्रकरणात कारवाई करण्याचे आदेश दि.१७ मे रोजी दिले होते. अनाधिकृत होर्डिंग्ज २४ तासात हटवण्यात आले नाही तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.मात्र याघटनेला १५ दिवस उलटूनही अद्याप होर्डिंग्ज हटविण्यात आले नसुन कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.मात्र याउलट मुख्याधिकारी निता अंधारेंकडुन अनाधिकृत होर्डिंग्ज धारकांची पाठराखण करण्यात येत असुन कारवाई करण्याऐवजी पालिकेने ते वैध करण्यासाठी खाजगी अभियंत्यांकडुन स्ट्रक्चरल ऑडिट करून घेऊन ते पालिकेकडे जमा करण्यात सांगितले असून त्यासाठी दोन आठवड्यांची मुदत देण्यात आली आहे .त्यामुळे उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्या आदेशाची अवमानना केल्याप्रकरणी जबाबदार मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

घाटकोपर मुंबई येथील होर्डिंग्ज कोसळुन घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून बीड शहराच्या कार्यक्षेत्रामध्ये तातडीने याबाबतच्या उपाययोजना करण्यात येत असुन विना परवाना होर्डिंग्ज ,बनर, फलक लावण्यासाठी उभा करण्यात आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर,बनर फलक २४ तासांच्या आत काढुन घेण्यात यावा नसता मुदतीनंतर आपणा विरोधात रितसर फौजदारी गुन्हा नोंद करून अनाधिकृत होर्डिंग्ज,बनर ,फलक लावण्यासाठी उभा करण्यात आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर ,फलक काढुन घेण्यात येईल व त्याचा रितसर खर्च आपणाकडून वसुल करण्यात येईल असे पत्रक सीईओ निता अंधारे यांनी काढुन १५ दिवस उलटूनही अद्याप एकावरही कारवाई न झाल्याने फौजदारी कारवाईचं नेमकं घोडं कुठं अडलं असा प्रश्न नागरीकांकडुन विचारला जात आहे.

# हिंगोली लोकसभा मतदार संघासाठी दोन विशेष मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती

## श्रीमती एम.एस. अर्चना यांच्याकडे वसमत, कळमनुरी, हिंगोली तर एम. पी. मारोती यांच्याकडे उमरखेड, किनवट आणि हदगाव विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १८व्या लोकसभेसाठीच्या मतदानाची निवडणूक प्रक्रिया पार पडली असून, मंगळवारी (दि.४) सकाळी ८ वाजतापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. १५-हिंगोली लोकसभा मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाकडून श्रीमती एम. एस. अर्चना आणि एम. पी. मारोती यांची विशेष मतमोजणी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणीला मंगळवार, दि. ४ जून रोजी सकाळी ८ वाजता सुरुवात होणार असून, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया लिंबाळा मक्ता येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात





होणार आहे. ९२- वसमत, ९३-कळमनुरी आणि ९४ - हिंगोली विधानसभा मतदारसंघाच्या विशेष मतमोजणी निरीक्षक म्हणून श्रीमती एम. एस. अर्चना या काम पाहणार असून, ८२- उमरखेड, ८३-किनवट आणि ८४ हदगाव विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी एम. पी. मारोती यांच्या निरीक्षणाखाली होणार आहे. श्रीमती अर्चना यांच्या संपर्क अधिकारी म्हणून विभागीय वन अधिकारी श्रीमती पुष्पा पवार (७५८९२१०३०६) व ए.सी.एफ. वन अधिकारी सुनील शिंदे (९४०५६१९८२८) हे या कालावधीत त्यांच्यासोबत राहणार आहेत. तर मतमोजणी निरीक्षक एम. पी. मारोती यांचे संपर्क अधिकारी म्हणून उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी शशीकिरण उबाळे (९७६३७२६९९५) हे त्यांच्यासोबत असतील, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे. १५-हिंगोली लोकसभा मतदार संघासाठी २६ एप्रिल रोजी म्हणजेच दुस-या टप्प्यात मतदान पार पडले होते.

# चि.सक्षम भागवतकर जिद्द व चिकाटी मुळे बारावीत यशस्वी-प्रा.अरुण बुंदेले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अमरावती । ज्ञानेश्वर बुधवत**




सक्षमने गरीब परिस्थितीवर मात करून आपल्या दीर्घ परिश्रमाने बारावी वाणिज्य शाखेत यश प्राप्त केलेले आहे.त्याची अभ्यासातील जिद्द व चिकाटीमुळे तो यशस्वी झालेला आहे.पुढील शिक्षण घेतानाही तो असेच दीर्घ परिश्रम करून आई - वडिलांचे उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न साकार करेल यात शंका नाही.असे विचार प्रा.अरुण बुंदेले यांनी व्यक्त केले.

ते श्री संत रविदास जीवन विकास बहुउद्देशीय संस्था अमरावतीच्या वतीने चि.सक्षम गणेशराव भागवतकरने वर्ग बारावी वाणिज्य शाखेमध्ये ७६% गुण मिळवून यशस्वी झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन करण्यात आलेल्या सत्काराप्रसंगी आदर्श अभ्यासाचे तंत्र या पुस्तकाचे लेखक,विद्यार्थीप्रबोधनकर्ते प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले यांनी ऑन लाईन शुभेच्छा देताना व्यक्त केले.

या यशाचे श्रेय चि.सक्षम भागवतकरने आई,वडील आणि गुरुजनांना दिले.सत्कारमूर्ती चि.सक्षम भागवतकर सत्काराला उत्तर देताना म्हणाला की, पुढे मला इंग्लिश माध्यमातून बी.कॉम. करायचे आहे आणि बी.कॉम. नंतर एम.बी.ए.करून आई - बाबांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करायचे आहे.त्यासाठी बारावीमध्ये जसा चांगल्याप्रकारे अभ्यास केला त्यापेक्षा अधिक चांगला अभ्यास करून पुढील शिक्षणात यश संपादन करायचे आहे. असे मनोगत व्यक्त केले .याप्रसंगी आई सौ.सविता गणेशराव भागवतकर, वडील श्री गणेशराव भागवतकर, थोरला भाऊ चि.शुभम (BAMS - मुंबई ),श्री संत रविदास जीवन विकास बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष श्री अनिल भागवतकर, श्री दिनेश भागवतकर (विभागीय अधिकारी ,श्री संत रविदास चर्मद्योग व चर्मकार विकास महामंडळ,महाराष्ट्र शासन, अमरावती),श्री सुनिल खंडारे , श्री संजय खंडारे,श्रीकृष्ण मोहोकर,श्री विशाल इंगळे, श्री रमेश भटकर इत्यादी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी चि.सक्षम भागवतकरचा सत्कार करून अभिनंदन केले.

# खत आणि बियाणे यांची साठेबाजी करून शेतकऱ्यांची लूट कराल तर याद राखा-शिवसंग्रामचा इशारा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आगामी काळात खरीप हंगामात आष्टी तालुक्यात आणि परिसरात बी -बियाणे आणि खते यांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून जादा दराने बियाणे आणि खतांची विक्री केली जात असते हे तात्काळ थांबले पाहिजे.शेतकऱ्यांना योग्य दरात आणि त्यांना हवेत त्या प्रमाणात बियाणे आणि खते उपलब्ध करून द्यावीत,अशी मागणी प्रसिद्धी प्रसिद्दी पत्रकाद्वारे शिवसंग्राम चे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी केली आहे .सध्या लवकरच महाराष्ट्रात मान्सून दाखल होणार आहे असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे त्याच पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकरी पेरणीसाठी धावपळ करत असतात याचा फायदा घेऊन अनेक कृषी सेवा केंद्रातून शेतकऱ्यांची लुबाडणूक होत करून जुन्या खताचा साठा असतानाही तो साठा न दाखवता वाढीव दराने सर्रास खत विक्री केली जात असते. खरिपाच्या पेरणीसाठी आवश्यक असलेल्या बियाणांसाठी ही शेतकऱ्यांना ताटकळत ठेऊन बाजारात खतांची आणि बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाऊ शकते. या बाबीकडे महसूल प्रशासन आणि कृषी खात्याने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.अनेक कृषी सेवा केंद्रामध्ये शेतकरी आणि विक्रेते यांच्यामध्ये वाद होत असतात. हे थांबले पाहिजेत.शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे.अशी मागणी चौधरी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

एकीकडे दुष्काळ जन्य परिस्थितीमुळे, पिकांना योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी अगोदरच अडचणीत सापडला आहे. त्याचे जीवन विस्कळीत झाले आहे.असे असताना या जगाचा पोशिंद्यालाच लुबाडण्याचे पाप व्यापारी करत असतात.शेतकऱ्यांना हव्या असलेल्या खतांच्या ऐवजी इतर खतांची विक्री करण्यासाठी कृषी केंद्र व व्यापारी आग्रही आसतात. तसेच शेतकऱ्यांना हव्या असलेल्या कंपनीच्या बियाणे ऐवजी इतर कंपन्यांची बियाणे विकण्यासाठी कृषी सेवा केंद्र प्रयत्न करत असल्याची ओरड शेतकऱ्यांमधून होत असते.बहुतांश वेळा बोगस बियाणांमुळे अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणीच्या संकटाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे आर्थिक बोजा सहन करावा लागला.तसेच उत्पादनातही घट झाल्याने तेथे ही तोटा सहन करावा लागला. अशा दुहेरी संकटात शेतकरी भरडला गेला होता. त्यामुळे आता शेतकऱ्यांना विश्वासाहर्ता असलेल्या कंपन्यांचीच बियाणे हवी आहेत. मात्र व्यापाऱ्याकडून इतर बियाण्यांसाठी आग्रह केला जात असेल शेतकऱ्यांनी ताबडतोब शिवसंग्रामशी संपर्क साधावा असे आवाहन चौधरी यांनी केले आहे. अडला हरी..... म्हणतात त्याप्रमाणे पेरणीच्या लगबगीत मिळेल ते बियाणे घेण्याकडे काही शेतकऱ्यांचा ओढा आहे. मात्र अशा बियाणांमुळे जर नुकसान झाले तर त्याला जबाबदार कोण? असाही प्रश्न निर्माण होतो आहे. या सर्व शेतकऱ्यांच्या अडचणीचा विचार करून शासन आणि प्रशासनाने तातडीने भरारी पथक तयार ठेवून शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून कार्य करावे.अशी आग्रही मागणी शिवसंग्रामचे ज्ञानेश्वर चौधरी करण्यात येत आहे.

# लोकसभा निकाल ४ जून परळी शहर पोलीस कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबाबत सज्ज-पो.नि.लोहकरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



परळी येथे कायदा व सुव्यस्था अबाधित राहावी यासाठी परळी शहर पोलीस पी आय लोहकरे यांनी सर्व पोलीस कर्मचारी यांना सतर्कतेचे आदेश देत जो कोणी कायदा सुव्यवस्था बिघाड होईल असे वर्तन करत असतील तर कोणाचीही गय करू नका असे आदेश दिले आहेत,बीड जिल्ह्यात येत्या १५ जूनपर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्हादंडाधिकारी दीपा मुधोळ यांनी हे आदेश जारी केले आहे. यांचे तंतोतंत पालन करावे,येत्या ४ जून रोजी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. यामुळे जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

रविवार २ जून २०२४ रोजी मध्यरात्रीपासून या मनाई आदेशाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. १५ जून मध्यरात्रीपर्यंत हा आदेश लागू असणार आहे. या कालावधीत पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येऊ नये.घोषणा करू नयेत,परळी शहरातील नागरिकांनी कोणतेही शस्त्र, सोटे, काठी तसेच शरीराला इजा होणाऱ्या बाळगू नये, असं सांगण्यात आलं आहे. तसेच अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही सोशल मीडियावर शेअर करू नये तसेच ती जवळ बाळगू नये, असं आवाहनही करण्यात आलं आहे.नागरिकांनी जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, यासारखी कृत्ये टाळावी. जेणेकरून जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार नाही, याची काळजी घ्यावी. असे आदेश परळी शहर पी आय लोहकरे पोलीस कर्मचारी यांना आदेश दिले आहेत.

# स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात छत्रपती शिवरायांचा इतिहास उलगडला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवराजाभिषेक सोहळ्याला ३५० वर्षे झाल्यानिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक यांच्या सहकार्याने सईशा प्रोडक्शन मुंबई निर्मित शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालन,संगीत शिवस्वराज्यगाथा, शिवकाळाचा वेध घेण्यासाठी झपाटलेले संग्राहक श्री रंजन गावडे यांनी शिवकालीन दुर्मिळ नाणी (शिवराई), भारतीय आणि परदेशी नोटा व नाणी आणि वस्तू तसेच त्यांनी काढलेल्या गडकिल्ल्यांच्या छायाचित्रांचे गाथा शिवशौर्याची हे प्रदर्शन आयोजित केले होते. यावेळी सागर पाटणकर यांनी सजविलेल्या शिवरायांची प्रतिमा असलेल्या दोन रुपयांच्या २२,२२२ नाण्यांनी साकारलेली शिवप्रतिमा हे या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण होते. मुंबई,कोलकाता,नोयडा आणि हैद्राबाद मिंट येथील नोटांचा यात समावेश होता. या तिन्ही कार्यक्रमांस रसिकप्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. शिवकालीन दुर्मिळ नाणी (शिवराई) प्रदर्शन, शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालनाला विशेष करून तरुण पिढीचा उत्तम प्रतिसाद मिळाला. यानिमित्ताने शिवचरित्र, शिवचरित्रातून व्यक्तिमत्व विकास, राष्ट्रीय चारित्र्य, शिचरित्रातून राष्ट्र विकास होण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन अशा विषयांवर प्रबोधनपर मार्गदर्शनही करण्यात आले होते. अनिल नलावडे यांनी लिहिलेल्या शिवचरित्रावरील विविध पैलूंवर काव्यमय पंक्ती याबद्दल सर्वांनाच विशेष पसंती दाखवली. अनिल नलावडे यांच्या लेखणीतून उतरलेले काव्य सादर करण्यासाठी गायक श्रीरंग भावे, नचिकेत देसाई, अनिल नलावडे आणि दीप्ती आंबेकर यांच्या सुरेल आवाजातून संगीत शिवस्वराज्यगाथा हा संगीतमय सोहळा सादर करण्यात आला. या दोन्ही कार्यक्रमांचे संयोजन, निवेदन, सूत्रसंचालन आणि दिग्दर्शन पद्मश्री राव यांनी केले. शिवराज्याभिषेकावरील सादर केलेल्या गाण्याला भरगच्च गर्दीने टाळ्यांच्या कडकडाटात उभे राहून मानवंदना दिली. ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ आप्पा परब, माई परब, ज्येष्ठ संगीतकार सोमनाथ परब आदी मान्यवर या सोहळ्यास उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904